महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

क्र.आस्थाप-२०२४/प्र.क्र.१०/नोंदणीशाखा

दि.१२ जून, २०२५

## निविदा सूचना

सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ हे विभागातील शासकीय वाहन स्कोडा रॅपीड वाहन क्र. MH-०१, CP-१५३० या जुन्या वाहनांच्या विक्रीकरिता मोहरबंद निविदा मागवित आहेत.

२. सदर निविदा दि.३०/०६/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पद्धतीने मोहोरबंद पाकीटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त झालेल्या निविदा दि.०२/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे राखून ठेवले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

आपली,

(शाहीन स्वा. शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

क्र.आस्थाप-२०२४/प्र.क्र.१०/नोंदणीशाखा दि.१२ जून, २०२५

## निविदा संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष दि.१३.०६.२०२५ ते दि.३०.०६.२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कक्ष अधिकारी, नोंदणीशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ येथे सादर करावी. त्यावर "स्कोडा रॅपीड वाहन क्र.MH-०१, सीपी-१५३० या वाहनांच्या खरेदीसाठी निविदा असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २ | "जशी आहे तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले स्कोडा रॅपीड वाहन क्र.MH-०१, सीपी-१५३० हे वाहन तपासणीसाठी नवीन प्रशासकीय भवन आवारात ठेवण्यात आले आहे. |
| ३ | ज्यांना रजीस्टर पोस्टाने निविदा पाठवायची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दि.३०.०६.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. निविदेसोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ४ | इसाऱ्याची रक्कम रु.३७०००/- कक्ष अधिकारी, रोखशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे जमा करावी. |
| ५ | इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर कक्ष अधिकारी, रोखशाखा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ६ | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल. |
| ७ | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरून एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस त्यास मुकावे लागेल. |

| | |
|---|---|
| ८ | वस्तू व सेवा कर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तू व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच वस्तू व सेवा कर (GST) भरल्याच्या पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| ९ | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरल्याच्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| १० | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, पांढरी शाई लावणे टाळावे तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| ११ | कोणतेही कारण न देता निविदा फेटाळण्याचा अधिकार सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना राहतील. |
| १२ | शासकीय वाहन स्कोडा रॅपीड वाहन क्र. एमएच-०१, सीपी-१५३० च्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| १३ | लिलावाची सुरुवातीची किंमत (Auction Start Price) रु.३,७३,५८९/- इतकी असेल. |
| १४ | लिलावाचे वाढीव मुल्य रु.५००/- इतके असेल. |
| १५ | सदर वाहन आहे त्या ठिकाणावरुन हलविण्याची जबाबदारी यशस्वी निविदाधारकाची असेल. |

आपली,

SShamd

(शाहीन स्वा. शेख)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन